पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **०८**

**सभावृत्तांत**

दिनांक - **२४/०२/२०२२** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा गुरूवार, दिनांक **२४/०२/२०२२** रोजी **दु.२.३०** वा. मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जानेवरी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली होती. मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती या महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांचे दालनातून सभा संचलित केली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा. सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

**१. मा.सविता बाळकृष्ण खुळे - सभापती**
२. मा. पवळे सुमनताई मधुकर
३. मा. मुंढे उषा अंकुश
४. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे
५. मा. गायकवाड निर्मला मनोज
६. मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
७. मा.गोफणे अनुराधा देविदास
८. मा. दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा. उल्हास जगताप - नगरसचिव, मा. अजय चारठाणकर - उप आयुक्त, मा. सुहास बहाद्दरपुरे - समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) बाळंतविडा संच पुरविणेबाबत.
मा.योगीता नागरगोजे व मा. निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) अभ्यास दौरा आयोजीत मान्यता बाबत.
मा. अनुराधा गोफणे व स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव.

----------

**मा. स्वाती (माई) काटे** - मा.सभापती महोदया, सभावृत्तांत कायम करताना दिनांक- १०/०२/२०२२ च्या पुढे दिनांक ११/०२/२०२२ नमुद करुन दुरुस्तीसह सभावृत्तांत कायम करणेत यावा ही विनंती.

**सभापती - सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह मा. महिला व बालकल्याण समिती सभा (कार्यपत्रिका क्रमांक ०७) दिनांक १०/०२/२०२२ व दिनांक ११/०२/२०२२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.**

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले**

ठराव क्रमांक - २४ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २४/०२/२०२२
सुचक - मा.योगीता नागरगोजे अनुमोदक - मा.निर्मला गायकवाड
संदर्भ - मा. योगीता नागरगोजे व मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दवाखान्यांमध्ये शहरातील गरीब कुटुंबातील महीला ह्या प्रसुती करिता येत असतात. त्यांची प्रसुती झालेनंतर

त्यांच्या बाळांकरिता महापालिकेमार्फत बाळंतविडा संच पुरविणे आवश्यक आहे. त्या बाळंतविडा संच मध्ये खालील प्रमाणे उपयुक्त साहित्य देण्यात यावे.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **नग** |
|---|---|---|
| १ | फ्रॉक बेबी | १ |
| २ | लंगोट बेबी | ६ |
| ३ | दुपटे | २ |
| ४ | झबला | २ |
| ५ | स्वेटर/सॉक्स | १ |
| ६ | टोपड/कॅप | २ |
| ७ | चादर/ब्लँकेट | १ |

उपरोक्त तपशिल नगाप्रमाणे महापालिकेच्या दवाखान्यांसाठी आवश्यक बाळंतविडा संच खरेदी करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २५ विषय क्रमांक - ०२

दिनांक - २४/०२/२०२२

सुचक - मा.अनुराधा गोफणे अनुमोदक- मा.स्वाती (माई) काटे

संदर्भ - मा. अनुराधा गोफणे व मा.स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव.

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांसाठी विविध प्रकारचे कल्याणकारी योजना राबविले जातात. या विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत नाविन्यपुर्ण योजना अधिक प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. यासाठी महिला सक्षमी करणात आग्रेसर असलेला केरळ राज्यात "**कुटुंब श्री**" या प्रकल्पाला भेट देणे तसेच तेथील महिला सक्षमी करणाच्या कामकाजाची पाहणी करणे यासाठी केरळ राज्यात माहे मार्च २०२२ मध्ये मा.महिला व बालकल्याण समितीचा तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा अभ्यास दौरा आयोजीत करणेकामी होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सविता बाळकृष्ण खुळे)**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/८६/२०२२
दिनांक : २८/०२/२०२२

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.